आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
३१ मार्च २०२५ -सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्यात सर्वत्र ईद उल फित्र  अर्थात रमजान ईद सणाचा उत्साह

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर

- औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, मात्र त्याचं उदात्तीकरण करू दिलं जाणार नाही असं महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचं स्पष्ट प्रतिपादन

- देशातल्या खासगी, बिगरअल्पसंख्य शैक्षणिक संस्थांमध्येही SC, ST आणि OBC साठी राखीव जागांकरता कायदा करण्याची काँग्रेसची मागणी

**आणि**

- आयपीएल क्रिकेटमधे मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातला सामना मुंबईच्या वानखेडे मैदानावर आज रंगणार

**<><><><><>**

ईद उल फित्र अर्थात रमजान ईद हा सण आज सर्वत्र उत्साहात  साजरा केला जात आहे. पवित्र रमजान महिन्यानंतर येणाऱ्या या सणानिमित्त  आज ठिकठिकाणच्या मशिदी आणि ईदगाहमधे सामूहिक नमाज अदा करण्यात आली. मुस्लीम बांधव एकमेकांना भेटून शुभेच्छा, मिठाई आणि भेटवस्तू  देत ईदचा आनंद साजरा करत आहेत.  राज्यात मुंबईसह सर्वत्र ईद साजरी केली जात आहे. **छत्रपती संभाजीनगर** इथं छावणी परिसरातल्या ईदगाह मैदानावर सामुहिक नमाज पठण करण्यात आलं.  **वाशिम**मधे ईदगाह मैदानावर भाविकांनी नमाज अदा करत जगात शांतता नांदावी, अशी प्रार्थना केली. त्यानंतर गळाभेट घेत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. **अकोल्या**मधे हरिहर पेठेतल्या मैदानावर भाविकांनी  नमाज अदा  केली. अरबी

भाषेतले खुत्बा पठण सैय्यद फैजानुद्दीन यांनी केलं तर काजीमुद्दीन खातिब यांनी सामूहिक दुवा केली. **हिंगोली**तही भाविकांनी ईदची नमाज अदा केली. सोलापूरमधे ईद उत्साहात साजरी झाली. मुफ्ती सय्यद अमजद यांनी ईदगाह मैदानावर जमलेल्या भाविकांना एकतेचा संदेश दिला. नांदेडमधे देगलूर नाका इथल्या मैदानावर भाविकांनी नमाज अदा केली. धुळे शहरातही ईदचा उत्साह दिसून आला.

**<><><><><>**

देशभरात आज ईद-उल-फित्र उत्साहाने साजरी करण्यात येत आहे. रमजान ईदनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. हा सण बंधुता, सहकार्य आणि करुणेच्या भावनेला बळकटी देतो असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे की, सांस्कृतिक विविधतेतून मिळालेल्या शक्तीमधून एकजुटीनं राष्ट्राला पुढे नेण्यासाठी हा सण प्रेरित करेल. आशा, सामंजस्य आणि करुणा या भावना ईद निमित्ताने दृढमूल होतील, अशी कामना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा संदेशात व्यक्त केली आहे. राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ही ईद निमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. राष्ट्रपती आज संध्याकाळी मुंबईत येणार असून उद्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या ९० व्या वर्धापन दिन सोहळ्याच्या समारोप समारंभाला त्या उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

मुगल शासक औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, मात्र त्याचं उदात्तीकरण करू दिलं जाणार नाही, असं महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं. ते आज नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. कुणाला आवडो की न आवडो औरंगजेबाची कबर हे संरक्षित स्मारक आहे, असं फडणवीस म्हणाले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या खुलताबाद इथली औरंगजेबाची कबर काढून टाकण्याची मागणी गेले काही दिवस हिंदुत्त्ववादी संघटना करत होत्या. त्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांचं हे वक्तव्य महत्त्वाचं मानलं जात आहे.

**<><><><><>**

औरंगजेबाचा मुद्दा नाहक उपस्थित केला जात असल्याचं राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते सुरेश उर्फ भैय्याजी जोशी यांनी सांगितलं. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी औरंगजेबाच्या कबरीविषयी केलेल्या टिपणीबद्दल प्रतिक्रिया देताना ते नागपुरात वार्ताहरांशी बोलत होते. औरंगजेब इथंच मरण पावला, त्यामुळे त्याची कबर इथं आहे आणि ती तिथेच राहील, ज्याची श्रद्धा आहे तो कबरीला भेट देईल असं जोशी म्हणाले.

**<><><><><>**

राज्य शासनाच्या सर्व विभागांनी राज्य मंत्रिमंडळासमोर नवा प्रस्ताव ठेवताना अर्थसंकल्पातल्या निर्धारित तरतुदीपेक्षा जास्त खर्चाचा अंदाज असल्यास त्या वाढीचा स्पष्ट उल्लेख करण्याचे निर्देश राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिले आहेत. नवीन प्रस्तावात खर्चात झालेली वाढ यामुळे स्पष्टपणे लक्षात येईल, तसंच त्या वाढीसाठी संबंधित विभागाला जबाबदार धरता येणार आहे. वाढलेला खर्च मूळ तरतुदीपेक्षा किती जास्त आहे हे नमूद केल्याशिवाय प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवू नये असे निर्देश सौनिक यांनी दिले आहेत. राजकोषीय तूटीला आवर घालणं हा याचा हेतू असून हा निर्णय एका व्यापक धोरणाचा भाग आहे, असं एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने सांगितलं.

**<><><><><>**

देशातल्या खासगी, बिगरअल्पसंख्य शैक्षणिक संस्थांमध्येही अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांसाठी राखीव जागा ठेवाव्यात याकरता सरकारनं कायदा आणावा, अशी मागणी काँग्रेसनं केली आहे. या प्रवर्गातल्या नागरिकांच्या प्रगतीसाठी विशेष कायदे करायचा अधिकार सरकारला देणाऱ्या राज्यघटनेतल्या कलम १५, पोटकलम १५च्या अंमलबजावणीसाठी शिक्षण, महिला, युवा आणि क्रीडा क्षेत्रातल्या संसदीय समितीनंही नव्या कायद्याची शिफारस केल्याचं काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

बीड जिल्ह्यात मशिदीत स्फोट घडवल्याचा आरोप असलेल्या दोन्ही आरोपीवर यूएपीए कायदा लागू करावा, अशी मागणी माजी खासदार इम्तियाज़ जलील यांनी केली आहे. छत्रपती संभाजीनगर इथे रमजान ईदच्या नमाजानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. काल पहाटे गेवराई तालुक्यातल्या अर्ध मसला गावात हा स्फोट झाला. पोलिसांनी याप्रकरणी दोघांना अटक केली आहे. या दोघांवरही यूएपीए लागू करावा अशी मागणी जलील यांनी केली. नागपूर हिंसाचारतल्या आरोपीचं घर पाडण्यात आलं. ही कारवाई याही प्रकरणात करावी, कायदा सर्वांना समान असावा, असंही जलील म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई विमानतळावर सीमाशुल्क विभागाने बँकॉकहून आलेल्या एका प्रवाशाकडून ३ किलो गांजा जप्त केला आहे. आरोपी केरळचा रहिवासी असून हा गांजा त्याला बेंगळुरूमध्ये मुख्य तस्कराकडे पोहोचवायचा होता. असं त्याने चौकशीत कबूल केलं.

**<><><><><>**

अहिल्यानगर जिल्ह्यात शिर्डी इथं काल गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळावर रात्रीच्या वेळी विमान उतरवणे अर्थात नाईट लँडिंग सेवेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी इंडिगो कंपनीच्या विमानाचं यशस्वी लँडिंग झालं. भाजपचे माजी खासदार डॉ. सुजय विखे यांच्यासह विमान प्राधिकरणाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये, दंतेवाडा जिल्ह्यात सुरक्षा दलांचं संयुक्त पथक आणि माओवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत एक महिला माओवादी ठार झाली. रेणुका, उर्फ बानू उर्फ चैते उर्फ सरस्वती नावाच्या या नक्षलीवर २५ लाख रुपयांचं बक्षीस होतं.

सुरक्षा दलांचं एक संयुक्त पथक बिजापूर-दंतेवाडा जिल्ह्याच्या सीमेवरच्या जंगलात नक्षलविरोधी कारवाईसाठी गेलं असताना आज सकाळी ही चकमक झाली. घटनास्थळावरून एक रायफल आणि काही स्फोटकं जप्त करण्यात आली असून या परिसरात शोध मोहीम सुरू आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात सामना होणार आहे. संध्याकाळी साडे सात वाजता सामना सुरु होईल. काल विशाखापट्टणम इथं झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सनं सनरायजर्स हैदराबादवर ७ गडी आणि २४ चेंडू राखून विजय मिळवला. तर राजस्थान रॉयल्स आणि चेन्नई सुपर किंग्स या संघांदरम्यान झालेल्या सामन्यात राजस्थान रॉयल्सनं चेन्नई सुपर किंग्सचा ६ धावांनी पराभव केला.

<><><><><>

भारताचा अग्रणी टेनिसपटू युकी भांबरीनं एटीपी दुहेरी मानांकनात पहिल्या तिसात स्थान मिळवलं आहे. ही त्याची आजवरची सर्वोत्तम कामगिरी असून, तो

भारतातला दुहेरीचा सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला आहे. युका भांबरीने अलिकडेच मियामी खुल्या टेनिस स्पर्धेत पोर्तुगालचा न्युनो बोर्जेसच्या साथीनं उपांत्यपूर्व फेरी गाठली होती.

**<><><><><>**

धुळे शहरातल्या एका खासगी रुग्णालयातल्या गर्भपात केंद्रावर बेकायदेशीरीत्या गर्भपात केला जात असल्याची खबर मिळाल्यावरुन  वैद्यकीय चौकशी पथकाने आज छापा टाकला. पथकाने काही कागदपत्रं तसंच औषधं जप्त केली आहेत. इथल्या रुग्णांची आणि डॉक्टरांची चौकशी करून पंचनामा केला गेला, पंचनाम्याचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करणार असून गर्भपात केंद्राच्या प्रमुखावर गुन्हा दाखल केला जाईल असं वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बीड जिल्हा कारागृहात आज दोन कैद्यांमधे किरकोळ कारणावरुन बाचाबाची, आणि नंतर  हाणामारी झाली. या तुरुंगात संतोष देशमुख खून प्रकरणातले, तसंच परळी इथल्या बापू आंधळे खून प्रकरणातले आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. मात्र या मारहाण प्रकरणाशी सुदर्शन घुले, वाल्मीक कराड यांचा संबंध नाही, असं बीड जिल्हा करागृह अधिक्षक बी.एन. मुलाणी यांनी सांगितलं. दरम्यान संतोष देशमुख खून प्रकरणातल्या आरोपींना या कारागृहातून अमरावती किंवा नागपूरच्या कारागृहात हलवावं, अशी मागणी आमदार सुरेश धस यांनी केली आहे.

**<><><><><>**

येत्या २ दिवसांत मध्यमहाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी तर कोकण आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता असून सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे.

**//<><><><><>//**